आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ मार्च २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियात वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची आखाती देशांच्या प्रमुखांशी दूरध्वनीवरून चर्चा

- दुबईहून १४९ प्रवासी घेऊन एअर इंडियाचं विमान दिल्ली विमानतळावर उतरलं तर चेन्नई विमानतळावर २१७ प्रवाशांचं आगमन

- बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- होळी आणि धूलिवंदनाच्या सणाचा सर्वत्र उत्साह

**आणि**

- ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

पश्चिम आशियात वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री - मोहम्मद बिन सलमान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. सौदी अरेबियावरच्या हल्ल्यांचा मोदींनी निषेध केला आहे. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य लवकरात लवकर पुनःप्रस्थापित करणं अत्यंत महत्त्वाचं आहे; यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शविली. या कठीण काळात भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी सलमान यांचे आभार मानले.

बहरिनचे राजे हमाद बिन इसा अल खलिफा यांच्याशीही प्रधानमंत्री मोदींनी दूरध्वनीवरून संवाद साधला. देशातील भारतीय समुदायाला दिलेल्या दृढ पाठिंब्याबद्दल त्यांनी बहरीनच्या राजांचे आभार मानले.

जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही मोदी यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि या भागातल्या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा काल रात्रीपासून अंशतः पुन्हा सुरू झाली असून त्यामुळे तिथं अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुबई आणि अबू धाबीपासून दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूकडे काही प्रमाणात विमानसेवा सुरू करण्यात आली. दुबईत अडकलेल्या १४९ प्रवाशांना घेऊन आलेलं एअर इंडियाचं विमान आज सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी दिल्ली विमानतळावर उतरलं, तर एमिरेट्स कंपनीचं विमान २१७ प्रवाशांना घेऊन चेन्नई विमानतळावर उतरलं. दरम्यान, संबंधित विमान कंपनीकडून विमान उड्डाणाबाबतची निश्चित माहिती मिळाल्याशिवाय प्रवाशांनी विमानतळावर जाऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

भारतातल्या विविध विमानतळांवरुन आखाती देशांकडे जाणारी अनेक उड्डाणं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं स्थगित केली आहेत. आज दिवसभरातली ३५७ उड्डाणं रद्द झाली आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवलं असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातल्या १६४ जणांना परत आणण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन विमानांची व्यवस्था केली आहे. फुजरौह विमानतळावरून आज दुपारी साडेतीन आणि साडेचार वाजता ही विमानं मुंबईच्या दिशेने उड्डाण करतील, असं उपमुख्यमंत्री कार्यालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. तसंच, मध्य पूर्वेत अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी राज्य सरकारनं ९७१५ ०३६५ ४३५७ हा आपत्कालीन व्हॉट्सअॅप मदत क्रमांक जारी केला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आज व्हाईट हाऊसमधे जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांची भेट घेणार आहेत. यानंतर दोन्ही नेत्यांमधे द्विपक्षीय चर्चा होईल. या भेटीत आपण ट्रम्प यांच्याशी पश्चिम आशियातल्या संघर्षाविषयी बोलणार असल्याचं मर्झ यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशिया प्रदेशातल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या येत्या ५ आणि ६ मार्च रोजी होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परीक्षांच्या नव्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. येत्या गुरुवारपर्यंत परिस्थितीचा आढावा घेऊन ७ तारखेपासून नियोजित असलेल्या परीक्षांबाबत निर्णय घेण्यात येईल, असंही मंडळाने कळवलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यूट्युबवर ३ कोटी सबस्क्रायबर्सचा टप्पा ओलांडला असून ते यूट्युबवर सर्वाधिक फॉलोअर्स असलेले जागतिक नेते बनले आहेत. ही संख्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या तुलनेने सातपट जास्त आहे. ब्राझीलचे माजी अध्यक्ष जैर बोल्सोनारा ६० लाख सबस्क्रायबर्ससह दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

**<><><><><>**

बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमधे ‘शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती’ या विषयावर ते दूरस्थ पद्धतीने बोलत होते. आज जग परिवर्तनशील आणि विश्वासार्ह भागीदाराच्या शोधात आहे, त्यामुळे भारताला ही एक मोठी संधी आहे, असं मोदी म्हणाले. अधिक उत्पादन करणं, अधिक निर्यात करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे, भारताने अनेक देशांशी मुक्त व्यापार करार केल्यामुळे संधीची दारं उघडली गेल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

- **- - होल्ड बाईट मोदी - - -**

गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची जबाबदारी सर्वांची असून देशात तयार होणारी उत्पादनं जागतिक दर्जाची असायला हवीत असं ते म्हणाले. बदल घडवून आणण्यासाठी वित्तीय संस्था, उद्योग आणि राज्य सरकारांनी एकत्र येऊन काम करायला हवं, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

जगाच्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, सुरुवातीच्या काळात तंत्रज्ञानात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना येणाऱ्या काळात उदयोन्मुख बाजारपेठांमधे प्रवेश मिळेल असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक वन्यजीव दिनानिमित्त आज विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. या ग्रहाचे रक्षण करणाऱ्या वन्यजीव आणि वनस्पतींच्या असाधारण विविधतेचं स्मरण हा दिवस करून देतो असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे.

पृथ्वी ग्रह समृद्ध करणाऱ्या तसंच परिसंस्थेचं जतन करणारी असामान्य विविधता साजरी करण्याचा हा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

भारताची कालातीत नीतिमूल्यं निसर्गाशी एकरूप होऊन राहण्याचे धडे देते. भावी पिढ्यांसाठी वन्यजीवांचं जतन आणि संरक्षण करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांचा संकल्प आजच्या दिवसाने दृढ होतो असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे.

तर, जागतिक वन्यजीव दिवस हा पृथ्वीची असामान्य जैवविविधता साजरी करण्याचा दिवस आहे असं पर्यावरण, वन आणि वातावरण बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्रालयाची सेवा संकल्प बैठक नवी दिल्ली इथे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत संरक्षण मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठरावाचं वाचन करून त्यातल्या मार्गदर्शक तत्वांप्रति असलेल्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या बैठकीत दैनंदिन कामकाजात या तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भातही चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

देशभरात आज सर्वत्र रंगांची उधळण करून धुळवडीचा सण उत्साहाने साजरा केला जात आहे. देशाच्या उत्तर भागात वृंदावन, मथुरा इथे कृष्णमंदिरांमध्ये धुळवडीनिमित्त भाविकांनी गर्दी केली आहे. पश्चिम बंगालमध्येही नवद्वीप, मायापूर, शांतीपूर या जिल्ह्यांमध्येही श्रीकृष्णाचा डोल उत्सव साजरा केला जात आहे. होळीच्या सणानिमित्त देशभरात सुरक्षा व्यवस्थाही कडेकोट करण्यात आली आहे. होळीच्या नावाखाली दारू विक्री, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी ऑपरेशन आघात ४.० राबवण्यात आल्याची माहिती दिल्लीचे पोलीस सहआयुक्त संजय कुमार जैन यांनी दिली आहे. या कारवाईत ४ हजार जणांना अटक करण्यात आली असून ९७५ जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. त्याशिवाय अनेक शस्त्रास्त्रं जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथक एटीएसने राज्यातल्या तीन जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. आयसीस या दहशतवादी संघटनेशी संबंधित मुंबईत कुर्ला, शिवाजीनगर आणि गोवंडी भागात ही कारवाई करण्यात आली. तर यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही छापे टाकण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यात १२ ठिकाणी शोधमोहीम राबवण्यात आली. या कारवाईत ७४ लाख रुपये रोख, तलवारी आणि चाकूंसह अन्य धारदार शस्त्रं जप्त करण्यात आली. ही शस्त्र बाळगल्याबद्दल दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय अनेक कागदपत्रं, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि सीसीटीव्ही कॅमेरेही जप्त करण्यात आले असून त्यांची तांत्रिक तपासणी केली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात पुसद आणि उमरखेड भागातल्या १४ संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे.

**<><><><><>**

ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून इंग्लंडमधे बर्मिंगहॅम इथं सुरुवात होत आहे.  भारताचा १२ खेळाडूंचा संघ स्पर्धेत उतरला आहे. पुरुष एकेरीत भारताचा अग्रगण्य खेळाडू लक्ष्य सेनचा सामना पहिल्याच फेरीत चीनच्या शी यू ची याच्याशी होणार आहे.

महिला एकेरीत मालविका बनसोड हिच्यासमोर चीनच्या चेन यूफेई हिचं आव्हान असेल. तर उन्नती हुड्डा हिचा सामना थायलंडच्या पोर्नपावे चोचुवोंग हिच्याशी होणार आहे. पुरुष दुहेरीत भारताची सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी उद्या मलेशियाच्या जोडी विरुद्ध खेळेल.

अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आखाती हवाई क्षेत्र बंद झाल्याने  ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, दुबईमध्ये अडकली होती, त्यामुळे ती या स्पर्धेत खेळू शकणार नाही. दरम्यान पी व्ही सिंधू मायदेशी सुखरूप परतली आहे.

**//  <><><><><>//**